**विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक, औरंगाबाद यांचे कार्यालय**

जा.क्र. विभुसंअ/विघऔ/भूसं/ ५९९

औरंगाबाद महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत, टप्पा क्र. ३, पहिल्या मजल्यावरील दक्षिणेकडील दालन.
दि. :०४ - १२ - २०१९

प्रति,

मा. व्यवस्थापक,
राष्ट्रीय माहिती केंद्र (NIC),
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

**विषय :- भुसंपादन सिडको वाळूज महानगर प्रकल्प क्र. ४ औरंगाबाद**
मौ. गोलवाडी येथील गट नं. ४४ पैकी ०.४१ हे. क्षेत्र संपादन करणेस्तव भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३/(२०१३ चा ३०) च्या कलम २१ खंड (१) व (२) ची जाहिर प्रकटनाची नोटीस प्रसिध्द करणे बाबत.

मौजे गोलवाडी ता.जि. औरंगाबाद येथील गट नं. ४४ पैकी मधील क्षेत्र संपादित होत असून त्याबाबतची भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३/(२०१३ चा ३०) च्या कलम २१ खंड (१) व (२) ची जाहिर **नोटीस मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाच्या** वेबसाईटवर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

सोबत जाहिर नोटीस प्रत पाठवित आहे. कृपया ती वेबसाईटवर प्रसिद्ध करावी ही विनंती.

सहपत्र : वरीलप्रमाणे

SPECIAL LAND ACQUISITION OFFICER • Special Unit, Aurangabad •

Kulkarni D.V.
(दी.व्य.कुलकर्णी)
विशेष भूसंपादन अधिकारी,
विशेष घटक, औरंगाबाद

Scanned by CamScanner

सुर

**भुमिसंपादन, पुनवर्सन व पूनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम २१ खंड (१) व (२) ची नोटीस**

जा.क्र. विभूसंघ/विघऔ/भुसं/ ५९८
विशेष भूसंपादन अधिकारी,
महानगरपालिकेची प्रशासकीय इमारत
टप्पा क्र.३ पहिल्या मजल्यावरील
दक्षिणेकडील दालन,
दि. ०४ /१२/२०१९

**जाहिर नोटीस**

**प्रकरण :- भुसंपादन सिडको वाळूज महानगर प्रकल्प क्र. ४ औरंगाबाद**
मौ. गोलवाडी येथील गट नं. ४४ पैकी ०.४१ हे. क्षेत्र संपादन करणेस्तव भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३/(२०१३ चा ३०) च्या कलम २१ खंड (१) व (२) ची जाहिर प्रकटनाची नोटीस प्रसिध्द करणे बाबत.

मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६ पोटकलम (४) सह भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शतेचा हक्क अधिनियम - २०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम १९ अन्वये काढलेली अधिसुचना क्र. आरबीडेस्क/एलएक्यू/समन्वय/भुसं/५/०९/CR-३८/२०१८ दि. २३/०३/२०१८ ही महाराष्ट्र शासनाचे राजपत्र भाग-१ औरंगाबाद विभागीय पूरवणी पान क्र. ६२१ वर दि. २९/०३/२०१८ तसेच दैनिक आत्ताच एक्सप्रेस दि.२७/०३/२०१८ व दैनिक महाराष्ट्र टाईम्स दि. २८/०३/२०१८ या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली असुन त्यासोबतच्या अनुसूचीत दर्शविल्याप्रमाणे जमिनी, मालमत्ता वरील सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्यात येऊन ताबा घेण्यात येणार आहे.

अनुसूची- एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

गावाचे नाव : गोलवाडी, तालुका : औरंगाबाद, जिल्हा : औरंगाबाद

| अनुक्रमांक | गट क्रमांक | संपादित होणारे अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १ | ४४ | ०.४१ |

सदर जमिन मालमत्तेमध्ये ज्यांचे हितसंबंध असतील त्यांना हितसंबंधाचे स्वरुप, हितसंबंधाबाबतच्या नुकसान भरपाईची मागणी स्वरुपात व संपादित करण्यात येत असलेल्या क्षेत्रफळाबाबत त्यांना काही हरकत असल्यास तशी हरकत इ. तपशिल या कार्यालयास स्वत: किंवा प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी मार्फत नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन किमान ३० दिवस व जास्तीत जास्त ६ महीन्याच्या आत खालील सही करणार यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत हजर राहून आपले निवेदन प्रत्यक्ष सांगावे व लेखी सादर करावे.

Kulkarni D.V.
(दी.व्यं.कुलकर्णी)
विशेष भूसंपादन अधिकारी,
विशेष घटक, औरंगाबाद

SPECIAL LAND ACQUISITION OFFICER
Special Unit, Aurangabad.

D/Technical/Golwadi Gut No. 44 Additional Proposal 0.41 H/जाहिर नोटीस

Scanned by CamScanner